# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# पुणे वृत्तांत
# वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक- 09.01.2026 वार- शुक्रवार**

---

**रब्बीपेरण्या**

राज्यात रब्बी हंगामात मुख्य पीक असलेल्या गहू आणि हरभऱ्याच्या १०० टक्के पेरण्या पूर्ण झाल्या असून ज्वारीची पेरणी 84 टक्क्यांवर पोहोचली आहे. एकंदर रब्बी हंगामातील पिकांच्या पेरणीनं सरासरी ओलांडली असून 101 टक्के पेरण्या पूर्ण झाल्या आहेत.

महानगरपालिका निवडणुकीच्या प्रचाराला आता रंग चढत आहे. विविध पक्षांचे प्रमुख नेते झंझावाती प्रचार दौरे करत आहेत. जनतेशी थेट संवाद, जाहीर मुलाखती, रोड शो या माध्यमातूनही जोरदार प्रचार सुरू आहे.

**संवादपुणेकरांशी**

पुणे महानगरपालिका निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर पुण्याच्या भविष्यातील विकासाचं व्हिजन मांडण्यासाठी 'संवाद पुणेकरांशी' या कार्यक्रमात भाजपा नेते आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस येत्या रविवारी ११ जानेवारीला मुलाखतीच्या माध्यमातून पुणेकरांशी थेट संवाद साधणार आहेत.

**एकनाथशिंदे**

शिवसेना नेते आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज पुण्यात विविध ठिकाणी जाहीर सभा घेतल्या. विकास हाच आमचा अजेंडा आहे असं ते म्हणाले. शिवसेना पहिल्यांदाच पुण्यात स्वबळावर लढत आहे.

**<u>अजितपवार</u>**

राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी एका वृत्तसंस्थेला दिलेल्या मुलाखतीत पुणे आणि पिंपरीतील स्थानिक नेतृत्वावर टीका केली.

**<u>पिंचिंनिवडणूक</u>**

पिंपरी चिंचवड महानगरपालिका सार्वत्रिक निवडणुकीत यंदा महिला उमेदवारांचा टक्का लक्षणीय आहे. 691 उमेदवारांपैकी महिला उमेदवारांची संख्या 317 इतकी आहे.

**<u>पुरस्कार</u>**

स्वामी विवेकानंद जयंतीनिमित्त साजऱ्या होत असलेल्या राष्ट्रीय युवकदिनाचं औचित्य साधून "विदिशा विचार मंच"तर्फे डॉ. दीपक शिकारपूर यांना पहिला ‘स्वामी विवेकानंद युवा सक्षमीकरण पुरस्कार’ जाहीर झाला आहे. येत्या रविवारी ११ जानेवारी रोजी , टिळक रस्त्यावरील, महाराष्ट्र साहित्य परिषदेत हा पुरस्कार प्रदान करण्यात येईल, अशी माहिती विदिशा विचार मंचच्या संस्थापक-संचालक ममता क्षेमकल्याणी यांनी दिली आहे.

**<u>विज्ञान प्रदर्शन</u>**

विद्यार्थ्यांच्या मनात वैज्ञानिक दृष्टिकोन आणि कुतूहल पेरण्यासाठी पुणे जिल्हा परिषद प्रशासनाच्या वतीनं वाघोली इथं विज्ञान प्रदर्शनाचं आयोजन करण्यात आलं होतं. थोर शास्त्रज्ञ डॉक्टर सी.व्ही. रमन यांच्या कार्याला अभिवादन म्हणून रॉकेटचं प्रक्षेपण करून या विज्ञान प्रदर्शनाचा शुभारंभ करण्यात आला.

आयुकाचे वरिष्ठ शास्त्रज्ञ डॉक्टर समीर दुरडे, आयसरचे तांत्रिक अधिकारी डॉक्टर अंकिष तिरपुडे, पुणे जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी गजानन पाटील, आणि इतर अधिकारी आणि मान्यवर उपस्थित होते.

**<u>बांधकाम</u>**

बांधकाम क्षेत्र झपाट्यानं वाढत असून, त्यामध्ये नाविन्यता पाहायला मिळत नाही. त्यामुळे स्थापत्य अभियांत्रिकीच्या विद्यार्थ्यांनी नोकरी-व्यवसायाबरोबरच संशोधन आणि नवोन्मेष करण्यावर भर देऊन बांधकाम क्षेत्राला नवे आयाम देण्यासाठी प्रयत्नशील राहावं असं प्रतिपादन क्रेडाई नॅशनलचे उपाध्यक्ष रणजित नाईकनवरे यांनी आज केलं. पुणे कन्स्ट्रक्शन इंजिनिअरिंग रिसर्च फाऊंडेशन , पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण आणि पिंपरी-चिंचवड महानगरपालिका यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'कन्स्ट्रो २०२६' या चार दिवसीय विसाव्या आंतरराष्ट्रीय प्रदर्शनाच्या उद्घाटन सोहळ्यात नाईकनवरे बोलत होते. केंद्रीय रस्ते आणि वाहतूक मंत्री नितीन गडकरी यांनी यावेळी दूरस्थ पद्धतीनं मार्गदर्शन केले. मोशी इथल्या आंतरराष्ट्रीय प्रदर्शन केंद्रात ११ जानेवारी पर्यंत हे प्रदर्शन सुरु असणार आहे.

**<u>ऑलिम्पियाड</u>**

तेर पॉलिसी सेंटर आणि टाटा मोटर्स यांच्या संयुक्त विद्यमानं पर्यावरण संवर्धन आणि जनजागृतीच्या उद्देशाने  राष्ट्रीय स्तरावरील ऑनलाइन ऑलिम्पियाड स्पर्धेचा पारितोषिक वितरण समारंभ माजी केंद्रीय पर्यावरण मंत्री प्रकाश जावडेकर यांच्या हस्ते झाला. यावेळी बोलताना जावडेकर यांनी पर्यावरण संरक्षण, शाश्वत विकास आणि नैसर्गिक संसाधनांच्या संवर्धनाबाबत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केलं.

**<u>पुणेविद्यापीठ</u>**

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात येत्या 12 तारखेला आंतरमहाविद्यालयीन वाद-विवाद स्पर्धेचे आयोजन करण्यात आलं आहे. या स्पर्धेमध्ये कृत्रिम बुद्धिमत्ता, स्टार्टअप संस्कृती, समाज माध्यमांचा प्रभाव, आर्थिक साक्षरता इथयादी विषयांचा समावेश करण्यात आला आहे.

**कार्यशाळा**

तळेगाव ढमढेरे इथल्या साहेबराव शंकरराव ढमढेरे कला आणि वाणिज्य महाविद्यालयात आज सायबर सुरक्षा जागरूकता कार्यशाळेचं आयोजन करण्यात आलं होतं. या कार्यशाळेला खडकी येथील टीकाराम जगन्नाथ महाविद्यालयचे उपप्राचार्य प्रा राजेंद्र लेले यांनी विद्यार्थ्यांना सायबर गुन्हे आणि ऑनलाइन धोके यांची माहिती दिली. विद्यार्थ्यांनी या कार्यशाळेमध्ये उत्स्फूर्त सहभाग घेतला

**हवामान**

पुणे आणि परिसरात थंडीचा जोर पुन्हा वाढत असून आज 8 पूर्णांक 4 दशांश अंश सेल्सियस किमान तापमानाची नोंद झाली. उद्याही असच तापमान राहण्याचा अंदाज हवामान विभागानं वर्तवला आहे.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये, नमस्कार.**